**TEST-2** — Code : KICK

**प्रश्नपुस्तिका** — Sr. No. 1234

**सामान्य क्षमता चाचणी** — एकुण प्रश्न : 80

**वेळ : 2 (दोन) तास** — **(पेपर - II)** — **एकुण गुण : 200**

---

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 80 प्रश्न अनिवार्य आहेत. उमेदवारांनी उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परिक्षाक्रमांक ह्या चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सुचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1,2,3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सुचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमुद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. ह्याकरिता फक्त काळया शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नाची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने सोडविणे श्रेयस्कर आहे पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालवता नंतर त्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एखादे नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) प्रस्तुत परिक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील तसेच उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील.

KARVY'S INSTITUTE FOR COMPETITIVE KNOWLEDGE
Plot No. 20, 'Vatsala' Vanrai Nagar, Manewada, Nagpur-34
..Just for your goals

**स्पर्धेच्या युगामध्ये स्पर्धकास योध्दाच व्हावे लागते. योध्दा तोच जो आहे त्या परिस्थितीमध्ये झुंज देतो केवळ आपल्या ध्येयपुर्तीसाठी !**

**आपणही नक्कीच योध्दा असाल यात काही शंका नाही ....**

**मग घ्या शस्त्रे हातात ज्ञानार्जणाची, मेहनतीची, चिकाटीची, प्रामाणीकतेची आणि जिंका हे युध्द स्पर्धेचे !**

*All the Best...*

**परिच्छेद 1**

नाझी क्रूरकर्मा हिटलरच्या शुद्ध आर्य वंशाभिमानाच्या भंपक कल्पनेने केलेले यहुद्यांचे शिरकाण हा विसाव्या शतकावरचा मोठा डाग हिटलरने उभारलेल्या त्या छळछावण्या, केलेला नरमेध यांच्या अंगावर शहारे आणणा-या कहाण्या अजूनही जग विसरलेले नाही. पण त्यातून मानवजातीने काही शहाणपणा घेतला आहे असे दिसत नाही. आजही हिटलरचे 'वंश'ज देशोदेशी दिसत आहेत. कधी ते युगोस्लाव्हियात सर्ब विरूध्द क्रोएट विरूध्द बोस्नियन मुस्लीम असा वंशविच्छेदाचा क्रूर राष्ट्रीय खेळ खेळत आहेत. तेथे मुस्लिमांच्या झालेल्या शिरकाणाबद्दल अश्रू ढाळणारे इस्लामिक खिलाफतीचे धर्मयोद्धे आज सीरिया आणि इराकमध्ये याझिदी, तुर्कमेन, शबाक, ककाई, साबियन आणि शिया मुस्लिमांचे बीजसुद्धा शिल्लक राहू नये म्हणून 'धर्मयुद्ध' करीत आहेत. हिटलरचे यहुदींबाबतचे धोरण आणि याझिदींबाबतचे 'इस्लामिक स्टेट'चे धोरण यात काडीमात्र फरक नाही. या याझिदींच्या टोळया हरप्पा संस्कृतीच्या अखेरच्या कालखंडात सुमारे चार हजार वर्षांपूर्वी हिंदुस्थानातून मध्यपूर्वेत स्थलांतरित झाल्याचे अभ्यासक सांगतात. त्यांच्यानंतर सुमारे सहा हजार वर्षांनी त्यांच्याचप्रमाणे हिंदुस्थानातून स्थलांतरित झालेल्या रोहिगा या इंडो-आर्यन वंशाच्या लोकांवर आज वंशविच्छेदनाची तलवार टांगलेली आहे, हे रोहिंगा धर्माने मुस्लिम. ब्रिटिश काळात जगण्याच्या शोधात त्यांच्या टोळया ब्रह्मदेशात (म्यानमार) स्थलांतरित झाल्या. त्यातल्या काही पूर्व बंगालात होत्या. आज इतक्या वर्षांनी त्यांना पुन्हा एकदा तेथील 'घेटों' मधून पळ काढावा लागत आहे. आयुष्यभराची किडुकमिडुक कमाई पिशवीत भरून कुटुंबेच्या कुटुंबे जीव वाचवण्यासाठी मिळेल त्या बोटी आणि होडक्यातून शेजारच्या इंडोनेशिया, मलेशिया, थायलंडच्या आश्रयाला जात आहेत. हे देश तरी कुठे त्यांच्या स्वागताला तयार आहेत ? तेव्हा तेथे जायचे ते लपूनछपूनच. त्यासाठी मानवी तस्कर असतात. त्यांना भरमसाट पैसे देऊन निघायचे, परंतु मुक्कामी पोचण्याची हमी नाही. अशा २१० जणांच्या बोटी भर समुद्रात सोडून तस्करांनी पळ काढला, हालहाल होऊन ते मेले. काहींच्या बोटी किना-याला लागल्या. त्यातले अनेक जण तेथे मेले. उरलेसुरले कसेबसे सरकारी छावण्यांत पोचले. त्यांचे आजचे मरण उद्यावर ढकलले एवढेच. घेल्या जानेवारीपासून हे चालले आहे, पण त्याची सुरूवात सुमारे पाऊणशे वर्षांपूर्वीच झालेली आहे. ब्रिटिशांनी रोहिगांना म्यानमारमध्ये नेऊन वसवले. तेथे बौद्धधर्मीय राखीन आणि रोहिंगा यांच्यात आतले आणि बाहेरचे असा संघर्ष सुरू झाला. दंगली आणि शिरकाणे झाली. पुढे स्वातंत्र्यानंतर म्यानमारने रोहिगांची राष्ट्रीयताच काढून घेतली. जगात कोणालाच नको असलेले हीच त्यांची ओळख बनली. १९७८ नंतर तर त्यांची परिस्थिती अधिकच वाईट बनली. त्यांना म्यानमार सरकारने एकदा बांगलादेशी मुस्लीम ठरवले म्हटल्यावर त्यांना सरकार काही देणे लागतच नव्हते. उलट ती देशापुढची मोठी समस्या ठरली. बौध्द धर्मियांची मते मिळवण्यासाठी त्याचा जेवढा उपयोग तेवढाच त्या छळाला कंटाळून अनेक रोहिंगा बांग्लादेशात पळाले, त्यात अर्थातच आगीतून फुफाटयात जाणे एवढाच फरक

KARVY'S INSTITUTE

होता. तेथे त्यांच्या साह्याला धर्मही येऊ शकला नाही. आज तेथील छळ आणि हाल यांना कंटाळून अनेक जण पळत आहेत, मरत आहेत. एकविसाव्या शतकातील जग धार्मिक आणि वांशिक कट्टरतावादापुढे किती हतबल आहे याची ती मरू घातलेली उदाहरणे आहेत

**1. खालीलपैकी अचुक विधाने कोणती ?**

**(a)** धर्मयुध्द हे सत्य आहे

**(b)** वंशवाद मानवीय संस्कृतीचा अविभाज्य अंग आहे ?

**(c)** वंशवाद अशांततेचे जनक आहे

**(1)** केवळ a **(2)** केवळ a व b **(3)** केवळ c **(4)** वरील सर्व

---

**2. खालील विधाने लक्षात घ्या .**

**(a)** आजच्या युगात धर्म राष्ट्रीयत्वापेक्षा श्रेष्ठ दिसून येत आहे.

**(b)** धर्म मानवाचा तारणकर्ता आहे.

**परिच्छेदाच्या अनुषंगाने योग्य पर्यायी उत्तरे दया.**

**(1)** केवळ विधान a अचुक आहे. **(2)** केवळ विधान b अचुक आहे.

**(3)** दोन्ही विधाने अचुक आहेत. **(4)** दोन्ही विधाने अचुक नाहीत.

---

**3. रोहिंगा या इंडो - आर्वन वंशीयाबाबत अचुक विधाने कोणती?**

**(a)** हे मुस्लिम धर्मात परिवर्तन झालेले हिंदुस्थानातून मध्यपूर्वेस स्थलांतील झालेले लोक आहेत.

**(b)** हे पूर्व राष्ट्रांत स्थलांतरित झालेले लोक आहेत.

**(c)** ही भटक्या जमातीची लोक आहेत.

**(1)** केवळ a **(2)** केवळ b **(3)** केवळ a व c **(4)** वरील सर्व

---

**4. परिच्छेदावरून काय निष्कर्ष काढता येतो ?**

**(1)** मानवजात एकसंघ राहू शकत नाही.

**(2)** धर्म मानवाला अमानुष बनविते

**(3)** वर्णवाद मानवीय ऋणानुबंध विकसित करू शकत नाही.

**(4)** धार्मिक आणि वंशिक कट्टरतावाद थांबविणे शक्य नाही.

---

KARVY'S INSTITUTE

**5.** गाळलेली संख्या शोधा.

| | | |
|---|---|---|
| 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 |
| 2 | 3 | 4 |
| 39 | 57 | ? |

(1) 77
(2) 22
(3) 78
(4) 18

---

प्रश्न क्र. 6 ते 7:- दिलेल्या तक्त्यात सहा शहरांची लोकसंख्या (लाखात), पुरूषांचे स्त्रियांशी गुणोत्तर□तसेच वयस्क पुरूष आणि वयस्क स्त्रियांची टक्केवारी दिलेली आहे. ति असल्यापासून दिलेल्या प्रश्नाची उत्तरे सोडवा.

| शहर | लोकसंख्या□लाखात | पुरूष □स्त्रिया | वयस्क पुरूष % | वयस्क स्त्रिया % |
|---|---|---|---|---|
| A | 7.8 | 7 : 6 | 62 | 65 |
| B | 3.6 | 5 : 4 | 70 | 72 |
| C | 4.5 | 2 : 3 | 68 | 64 |
| D | 6.8 | 9 : 8 | 72 | 70 |
| E | 7.2 | 4 : 5 | 65 | 72 |
| F | 5.4 | 2 : 1 | 75 | 64 |

**6.** 'C' शहरातिल अवयस्क स्त्रिया F' शहरातिल अवयस्क पुरूषांपेक्षा किती टक्यांनी कमि किवा ज्यास्त आहेत □उत्तर **Round Figure** मध्ये द्यावे

**(1)** 8 % **(2)** 10 % **(3)** 12 % **(4)** 15 %

---

**7.** 'E' शहरातिल अवयस्क पुरूष B' शहरातिल अवयस्क पुरूषांच्या किती टक्के आहेत

**(1)** 60 % **(2)** 75 % **(3)** 80 % **(4)** 96 %

---

**परिच्छेद 2**

लंडन, हॅम्बर्ग, हॉंगकॉंग, सिंगापूर, न्यूयॉर्क, बोस्टन, सॅन फ्रान्सिस्को वगैरे भूमंडळावरील वित्तीय साम्राज्याची आज प्रस्थापित आगारे गणली जातात. तेथील दिग्गज गुंतवणूकदारांनी खूण करावी आणि भारतातील नवीन ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेतील कंपन्यांच्या प्रवर्तकांनी तेथील बाजारातून उभे राहिलेले भांडवल उपसून आपला

KARVY'S INSTITUTE

व्यावसायिक पसारा वाढवावा, हा आजवर चालत आलेला प्रघात आहे. गेल्या दोन दशकांत किमान डझनावारी भारतीय कंपन्या असतील ज्यांनी हाच परिपाठ अनुसरून आपले उद्योगसाम्राज्य फैलावल्याचे दिसून येईल. रिडिफ, सिफी, डब्ल्यूएनएस ही त्यातील काही ठळक नावे. तोळामासा जीव असलेल्या आणि पुरता नफाक्षमही न बसलेल्या त्यांच्या व्यवसायाला नॅसडॅक अथवा न्यूयॉर्क शेअर बाजारात अवाच्या सव्वा बाजारमूल्य मिळतानाही दिसले आहे. असा वित्तीय परीसस्पर्श या व्यवसायांच्या नवतरूण संस्थापकांना तोवर कल्पनेतही शक्य नव्हता. आयआयटी-आयआयएम मधून पदवी घेऊन बाहेर पडलेल्या, जुगाडू दृष्टिकोन, भन्नाट कल्पकता, दुर्दम्य ध्यास व अवीट जिद्दीच्या या पहिल्या पिढीच्या उद्योजकतेला असा विदेशातील गुंतवणूकदारांच्या पाठबळातून बहर यावा, यात वावगे काही नसले तरी असाच प्रयोग भारतातही आणि गुंतवणुकीची संधी भारतातील गुंतवणूकदारांनाही मिळावी, या कल्पनेला 'सेबी'ने मूर्तरूप देण्याचा निर्णय घेतला आहे. तीन वर्षांपूर्वी सूक्ष्म-लघू-मध्यम (एसएमई) उद्योगांसाठी असाच शेअर बाजारात सूचिबद्धतेतून भांडवलाची कवाडे खुली करणारा निर्णय घेतला होता. तोच आता ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेतील नवशिलेदारांसाठी अर्थात सेबीच्या परिभाषेत 'स्टार्टअप'ना खुला होत आहे. त्यांच्या व्यवसायासाठी आवश्यक भांडवलाचा स्त्रोत अधिक सहजसाध्य करणा-या या पावलांचे स्वाभाविकच उद्योगजगताने, स्वागत केले आहे. भारताची विशाल बाजारपेठ, अगणित संगणकक्षम, नेटकर व मोबाइलधारक लोकसंख्या आणि त्यातून अमर्याद व्यवसायशक्यतेचे कोंदण जर बाहेरच्या गुंतवणूकदारांना आकर्षक वाटत असेल, तर ज्या मातीत ही व्यावसायिक सर्जकता फुलत आहे, तेथील गुंतवणूकदारांसाठी ही खरे तर पर्वणीच ठरावी. 'सेबी'च्या संचालक मंडळाच्या मंगळवारच्या निर्णयामागे हाच विचार आहे. ज्ञान हेच प्रधान भांडवल गाठीशी घेऊन, उद्योग सुरू करणा-या या नवागत मंडळींना काळाच्या मागणीनुरूप पसारा विस्तारत नेणे क्रमप्राप्त असून, त्यासाठी 'पुंजी'रूपी भांडवलाची गरज लागतेच. साहसी भांडवलदार संस्थांनी नवागतांना पैशाची राशी खुल्याही केल्या आणि खासगी भांडवल स्वरूपात गेल्या दोन वर्षांत ५०० कोटी गुंतविले आहेत. रतन टाटासारख्या ज्येष्ठ उद्योगधुरीणाने व्यक्तिगत स्वरूपात जवळपास नऊ नवागतांना धन-पाठबळ दिले आहे. पण 'सेबी'च्या अंदाजाप्रमाणे आजच्या घडीला नवसर्जक उद्यमीची अर्थात

'स्टार्ट अप्स'ची संख्या तीन हजारांहून अधिक असेल. आर्थिक पाठबळ नाही म्हणून नवागतांची उमेद मारली जाऊ नये अथवा पैशाच्या जोरावर बडया धेडांकडून ती गिळंकृत होऊ नये, यासाठी टाकले गेलेले हे पाऊल स्वागतार्हच ठरावे. इंटरनेट, ई-व्यापार विश्वात आज भले सूक्ष्मसा ठिपका असेल, पण शिखर गाठायचेच अशी उमेद नाशिक, नागपुर, लुधियाना अशा छोटया शहरांतूनही दिसून येते. या उद्यमी नवशिलेदारांची स्वयंप्रेरणा शाबूत ठेवायची, तर त्यांची स्व-मालकी व अस्मिता कायम राखली जायला हवी. सेबीच्या निर्णयामागे असाच प्रयत्न आहे. उद्याच्या फेसबुक, गुगल अथवा ॲमेझॉन, ईबेसारख्या जगविख्यात नाममुद्रा घडविण्याच्या दिशेने आवश्यक रचनेची ही पायाभरणी नक्कीच !

KARVY'S INSTITUTE

**8. 'स्टार्ट अप' या संकल्पनेमागील भूमिका काय ?**

(1) सुशिक्षित नागरिकांना धंदयामध्ये प्रोत्साहित करणे.

(2) ज्ञानाच्या आधारावरील नवउद्योजकांना प्रोत्साहन देणे.

(3) लहान उद्योगधंदयांना मोठया उद्योगधंदयाच्या स्पर्धेपासून संरक्षण देणे.

(4) सुशिक्षित तरूणांना रोखे बाजारात गुंतवणुकीस पोत्साहित करणे.

---

**9. नवसर्जक उद्यमींच्या संकल्पनेतमध्ये खालीलपैकी कोणते घटक अडसर बनू शकतात ?**

(a) कल्पकता (b) जीद्द (c) भांडवल (d) ज्ञान

(1) केवळ a व b (2) केवळ a (3) केवळ b व d (4) केवळ c

---

**10. परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलपैकी कोणते विधान अचुक आहे ?**

(1) ज्ञानधारित अर्थव्यवस्था नव उद्यमींना पोषक आहे.

(2) ज्ञानधारित अर्थव्यवस्था ही मोठया उद्योगांकरीता उपयुक्त नाही.

(3) छोटया भागांमध्ये उद्योग धंदयांना विकासास वाव मिळत नाही.

(4) मोठया भांडवली उद्यंमीमुळे लघू नव उद्यमींना स्वमालकी हक्क सहज मिळतो.

---

**परिच्छेद 3**

लहान निरागस मुलं खेळताना आपण पाहिलीत काय? खेळताना ती तल्लीन होतात. त्यांच्या चेह-यावरच्या आनंदातून ते दिसतं. ती जिंकण्या-हरण्यासाठी खेळत नसतात; तर खेळण्यातल्या आनंदासाठीच खेळतात. माणसाचं जसं वय वाढतं, तसं निरागसपण हरवून जातं. मी, माझा व्यवसाय, अधिकार, मोठेपणा आणि संपत्ती, अहंकाराचे लेप वाढत जातात. मी बुद्धिवादी आहे. इतरांहून वेगळा आहे. ह्या चौकटी आक्रसत जातात. खेळ म्हटला की, त्याला नियम असतात. त्या चौकटीत खेळायचं असतं. नियम न मोडता खेळावं लागतं. खेळताना प्रत्येक खेळाडू अथवा संघ आनंद ऊर्जेनं खेळत असतो. आपण जिंकावं ही अंतर्मनातली ऊर्मी खेळाला इंधन पुरवित असते. यावरच खेळ रंगतदार होतो. तो खेळ बघणा-या प्रेक्षकांची उत्कंठा शिगेला पाहोचते. ते क्षणभर स्वत: खेळत असल्याचा अनुभव घेत असतात. अत्युच्च क्षणी सगळयांच्या उत्कंठता ताणल्या जातात. श्वास रोखले जातात. यशापयशाचा लंबक हिंदोळत असतो. बघणा-याची अवस्थाही टांगणीला लागते आणि एका क्षणी खेळ संपतो. जल्लोष होतो. हा जल्लोष आनंदाचा असतो आणि त्याच्या पोटात जिंकलेले आणि हरलेल्यांच्या उत्तम खेळाचा भाग असतो, खेळणारे दोन्ही गट आणि प्रेक्षकांनी अंतिम क्षणापर्यंत तो आनंद अनुभवला असतो. आपलं जगणं हा असाच एक खेळ आहे. जगण्याच्या वेगवेगळया टप्प्यावर माणसाला खेळावं लागतं. ती स्पर्धा,

KARVY'S INSTITUTE

अनुभव, अपयश, निराशा, ईर्षा, अडवणूक, प्रतिशह, चढाई या तंत्राने जीवनखेळ सुरू असतो. खेळताना खेळाडू प्रत्येक चाल शंभर टक्के ऊर्जेनं करतो. त्यामुळे यशाच्या जवळपास जाणं होतं. आमचं जगताना तसं होत नाही. मी आणि माझंच घोडं जिंकलं पाहिजे ही गोष्ट आड येते. माझ्यासोबतही आणखी आहेत, ही खेळातली भावना जगताना वितळल्यानं स्वार्थाचा घोळ सुरू होतो.

ते चांगले आहेत, माझ्यावरच अन्याय होतोय, ते बदमाश आहेत, तसं आम्हाला होता येत नाही. कधी कधी आम्ही बिघडलेला समाज अन् गरीब परिस्थितीला वेठीला धरतो. आपल्या जगण्यातल्या अडचणी-अपयशाचं खापर कोणाच्यातरी माथी मारण्याची ही केविलवाणी धडपड असते. आपल्या अपयश, दु:खाची जबाबदारी कुणावर तरी ढकलण्याचा हा प्रकार!

जगणं हा खेळ म्हटलं की, त्याला तोंड देणं हा खिलाडूपणा! जगण्यातील अडचणी, संकटं ह्या परीक्षाच असतात खेळाडूंना प्रतिहल्ला करण्यासाठी. तो क्षण एकदा स्वीकारला की, त्यावर मात करण्याचे बळ मिळत जातं. खेळताना जशी कळत नकळत चूक होते, तसे जगतानाही होऊ शकते. ती ओळखून पुन्हा न होऊ देणं, हा खेळाचां नियम. एकं ध्यानात ठेवा, प्रत्येक खेळात तुम्हीच जिंकलं पाहिजे, अशी तुमची जर मनोधारणा होत गेली तर खेळातला आनंदच निघून जाईल. प्रत्येक गोष्ट मला, माझ्या कुटुंबाला, परिवाराला, पक्षालाच मिळाली पाहिजे, हा अघोरी खेळ खेळातला आनंद हिरावून घेतो. उलट मला पुरे आता, ही भावनाही अनेकांच्या जगण्यात आनंदाची फुंकर घालू शकते. जगतानाही सगळं तुमच्या मनासारखंच घडत गेलं, तर ते जगणंही सपक होईल. खेळातला हा नियम ध्यानात ठेवून, आपापला जगण्याचा डाव सावरण्याची ही कलां विकसित करावी लागते.

**11. परिच्छेदाच्या अनुषंगाने खेळ आणि मानवीय जगणे यामधील साम्य काय असावयास हवे ?**

**(a)** बुध्दीवादीपणा च्या आधारावर तो नियमांचा अचुक वापर करतो.

**(b)** निखळ आनंद जो क्षणोक्षणी घेता येऊ शकतो.

**(c)** यश-अपयश जे अहंकार आणि दु:ख पदरी टाकते.

**(1)** केवळ a **(2)** केवळ a व b **(3)** केवळ b **(4)** केवळ b व c

---

**12. लेखकास खेळ आणि जगण्यामधील महत्वाचा फरक कोणता वाटतो ?**

**(1)** स्वयंकेंद्रीतपणा **(2)** क्षणभंगुरता **(3)** प्रतिहल्ला **(4)** आंतरमुग्धता

---

**13. लेखक मानवीय जगण्यामध्ये काय अपेक्षा करतो ?**

**(1)** व्यक्तीने अपयशाचे खापर स्वत:च्याच माथी मारले पाहिजे.

**(2)** मानवाने व्यापक दृष्टिकोनातून जीवन जगले पाहीजे.

**(3)** मानवाने खेळातील नियम आपल्या जीवनात अंगीकारले पाहिजे.

**(4)** खेळातील चुका मानवाने आपल्या जीवनात करू नये.

---



KARVY'S INSTITUTE

**14.** एका सांकेतिक भाषेत **'Anna is great Social activist of India'** ला **' bee lee nee yee jee pee tee '** **'India is great Country'** ला **' pee lee yee dee'** **'Corruption free Country'** ला **'oee dee vee'** **' Anna is old'** ला **jee lee fee'** आणि **remove corruption India'** ला **vee pee loo'** असे लिहितात तर **'Anna remove Corruption India'** साठी संकेत सांगा.

**(1)** loo pee jee dee **(2)** vee jee Loo nee

**(3)** pee loo tee jee **(4)** jee vee pee loo

---

प्रश्न क्र. 15 ते 16:- **8** मित्र **J, K, H, L, M, N, O** आणि **P** सरळ रांगेत उत्तरेकडे तोंड करून बसलेले आहेत. त्यात **3** पुरूष आणि **5** स्त्रिया आहेत. कोणतेही दोन पुरूष एकमेकांचे शेजारी नाहीत. **P** त्याच्या पत्निच्या उजविकडे दुसया स्थानावर बसलेला आहे तर **N** व **P** च्या उजवीकडे तिसया स्थानावर आहे. **J** रांगेच्या शेवटी असून तिच्या पतिच्या **(H** च्या) उजवीकडे दुसया स्थानावर आहे. **H** हा **P** च्या पत्निचा शेजारी नाही तसेच **K** आणि **P** शेजारी नाहीत. **M** तिच्या पतिच्या **(L** च्या) उजविकडे दुसया स्थानावर बसली आहे.

**15.** नेमक्या कोणत्या मैत्रीणिचे दोन्ही लगतचे शेजारी पुरूष आहेत

**(1)** P **(2)** O **(3)** H **(4)** N

---

**16.** **J** आणि **N** यांच्या मध्ये किती स्त्रिया बसल्या आहेत

**(1)** 1 **(2)** 2 **(3)** 3 **(4)** एकही नाही.

---

**परिच्छेद 4**

जगासाठी भारत ही एक विशालतम बाजारपेठ, तर आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनातून हा देश म्हणजे एक अदृश्य तटबंदी असलेली बंदिस्त अर्थव्यवस्था राहिला आहे. काहीच्या दृष्टीने हा दोष नव्हे तर आपले भूषण ठरतो. २००९ च्या जागतिक मंदीच्या काळातदेखील भारतीय अर्थव्यवस्था स्थिर राहिली, असे बडेजाव सूर यापायीच अधूनमधून उमटत असतात. बाह्य आर्थिक संबंध जेथे मुळातच कमी, त्या देशाची अर्थव्यवस्था बाहेरच्या घडामोडींबाबत असंवेदनशील असणे स्वाभाविकच ठरते. याच पार्श्वभूमीवर 'देशाची परराष्ट्र व्यापार तूट मे-२०१५ मध्ये घटली', या ताज्या विधानाकडे पाहायला हवे. विदेशातून होणारी आयात व देशातून होणारी निर्यात यांचा तोल असलेली ही व्यापार तूट घटत आहे. ही आनंदाचीच बाब आहे. पण हे झाले आयात व निर्यात दोन्ही पारडी हलकी ठरल्याने. निर्यातीचे पारडे जड होऊन अधिक झुकल्याने नव्हे निर्यातीची उतरती कळा तर सलग सहाव्या महिन्यात सुरू असल्याचे परवा जाहीर झालेल्या आकडेवारीने दाखवून दिले. चालू खात्यावरील तूट ही खरे भारताचे बाह्य जगाशी असलेल्या व्यापारी संबंधांचे अधिक व्यापक चित्र सादर करते. तीही जानेवारी ते मार्च

KARVY'S INSTITUTE

२०१५ या तिमाहीत देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या तुलनेत ०.२ टक्के असे बहुवार्षिक नीचांक स्तरावर ओसरली आहे. हा परिणाम आंतरराष्ट्रीय स्तरावर लक्षणीय घसरलेल्या तेलाच्या आयात मूल्याने साधला आहे. हे साफच आहे. विशेषत: आयातीवर खर्च होणा-या प्रत्येक १०० रूपयांत ७५ रूपये हे भारतात तेलाच्या आयातीसाठी जात असतात, हे पाहता गेल्या वर्षाच्या तुलनेत निम्म्याहून अधिक घटलेल्या तेलाच्या किमती आपल्या अर्थव्यवस्थेला किती मोठा दिलासा आहे, याची कल्पना यावी. पण अर्धांग म्हणजे निर्यातीची बाजू आजही पांगळीच आहे आणि त्या अंगाला अद्याप चपळता आलेली नाही, हेच खरे. 'एका प्रबळ आर्थिक सत्तेच्या दिशेने दमदार वाटचालीला भारताने सुरूवात केली आहे ' गेल्या वर्षभरात देश- विदेशात प्रत्येक व्यासपीठावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून आवर्जून केले गेलेले हे एक ठरलेले विधान होय. आपल्या देशाचे जागतिक स्तरावर आणि प्रत्येक देशाशी वैयक्तिक द्विपक्षीय नाते कसे व कितपत आहे, हा आर्थिक सत्ता म्हणूनं आपल्या घडणीतील महत्वाचा दुवा नक्कीच आहे. या पार्श्वभूमीवर खूप टीकाटिप्पणीचा मुद्दा बनलेले पंतप्रधानाचे भरमसाट विदेश दौरे हे खरे तर अत्यावश्यक आणि म्हणून स्वागतार्हसुध्दा ठरावेत. पण यातून प्रत्यक्षात साधले काय? तूर्त तरी या आघाडीवरील प्रगती शून्यच म्हणायला हवी. सबंध जगालाच आर्थिक मलूलतेने ग्रासले आहे, त्यामुळे भारतातून मागणी ओसरली, अशी निर्यात घसरणीची कारणमीमांसा करता येईल.

पण या मलूल वातावरणात भारताच्या निर्यातदारांची स्पर्धात्मक क्षमता अधिक प्रकर्षाने उघडी पडत चालली आहे आणि ते झाकण्याचा तो केवळ बहाणा आहे. एक तर आजही नैसर्गिक साधनसंपत्ती, खनिज पदार्थ तसेच ज्ञान आणि मनुष्यबळाचेच आपण निर्यातदार आहोत. तयार माल, उत्पादनांची देशांतून होणारी निर्यात खूपच तोकडी आहे. जी काही उत्पादन निर्यात होते तिला बदललेल्या बाह्य वातावरणाच्या पार्श्वभूमीवर ना उत्तेजन, ना पाठबळ अशी स्थिती आहे. वीज, पाणी, रस्ते आदी पायाभूत सुविधांचा अभाव, नियम-कानूंचे जंजाळ आणि वित्ताची आबाळ तर देशी उद्योगांच्या पाचवीलाच पुजली आहे. 'मेक इन इंडिया' सिंहगर्जनेनंतरही ती अव्याहत सुरूच आहे. त्यामुळे निर्यात-लकव्याचे मूळ बाहेर शोधण्यापेक्षा, घरातच शोधायला हवे.

**17. लेखकाच्या मते भारतीय अर्थव्यवस्था कशी आहे ?**

(1) स्थिरावलेली अर्थव्यवस्था
(2) मंदावलेली अर्थव्यवस्था
(3) बहुआयाती अर्थव्यवस्था
(4) स्वयंकेंद्रीत अर्थव्यवस्था

---

**18. परिच्छेदाचे अवलोकन करता खालीलपैकी कोणती बाब स्पष्ट होते ?**

(1) भारतीय निर्याताची स्थिती निरंतर कमजोर राहीली आहे.
(2) भारताच्या आयातीची स्थिती गुणात्मक दृष्टया वाढत चाललेली आहे.
(3) भारताचा व्यवहारतोल निर्यात वाढल्याने उत्तम झाला आहे.
(4) भारतातील आयातीत सर्वाधिक भरणा गोडे तेलाचा आहे.

---

KARVY'S INSTITUTE

**19. परिच्छेदाचे अवलोकन करता भारत देशाचा व्यवहारतोल कसा सुधारू शकतो ?**

(1) भारतीय अर्थव्यवस्थेचा प्रचार जगभर करून

(2) आंतरिक संरचना कार्यात्मकता यात गुणात्मक बदल करून

(3) निर्यातदारामध्ये स्पर्धा लावून

(4) आयातीमध्ये अधिक प्रमाणात कपात करून

---

**Paragraph 5**

A big let-down amid an otherwise progressive narrative in the Department of Telecommunications' recent report on net neutrality is its recommendation to bring voice over internet protocol-based (VoIP) domestic calling services, including applications such as WhatsApp, under licensing. The suggestion is that such services be regulated 'through exercise of licensing powers available under section 4 of the Indian Telegraph Act to ensure a level playing field.' This does not straightaway mean such calls will be chargeable. The more obvious implication is that such applications can't operate without the government's permission, which might be granted only on the fulfillment of certain conditions or the payment of a fee, or both. The DoT's report is by no means final and binding. Still, the stated logic behind such a suggestion is open to question. The report says telecom companies 'may become reluctant to invest in expansion of broad-band infrastructure' in an environment where apps that provide similar calling services eat into their revenues. Don't telecom companies benefit from the apps that ride on whatever services they provide? Doesn't more app usage mean more data consumed, which in turn mean more revenues for telecom companies ?

The recommendation could be flawed on multiple grounds. One, there is a good chance that if the suggestion is implemented the consumer might be worse off for it. But before that, there is a big question mark over whether differentiating a domestic VoIP call from an international one is possible at all. Bar this recommendation, the report does seem to largely reflect a nuanced understanding of the complexities of today's internet world. This is true even of its references to zero-rating schemes, under which the user is offered data or access to some sites free of cost. True, critics have taken the report to task for not recommending a ban on them. But there are

KARVY'S INSTITUTE

novel zero-rating schemes where the user is given free data and not a pre-selected bouquet of sites, as Facebook's internet.org does (the report doesn't seem to be in favour of this). It's heartening that the report repeatedly pitches for net neutrality, the principle of data equality that is important to ensure the internet remains a level-playing field. At the same time, it shows pragmatism in saying that 'enforcing ' net neutrality principle is a new idea and may throw up many questions and problems as we go along,' and that this may require a process of oversight. The report is laced with quotes, including this one from Archibald Putt: 'Technology is dominated by two types of people: those who manage what they do not understand.' It is to be hoped India doesn't live up to this.

**20. Consider the following statements?**

**(a)** Government is abide by the recommendation of Department of Telecommunications

**(b)** Department of Telecommunication is bonded to prepare advisory report on the telecom Sector

**Alternate Answer Codes**

**(1)** Only **a** is correct **(2)** Only **b** is correct

**(3)** Both are correct **(4)** Both are not correct

---

**21. Consider the following sentences?**

**(a)** Net neutrality is helpful for the level playing field in the internet domai.

**(b)** Data equality is possible after net neutrality.

**Alternate Answer Codes**

**(1)** Only **a** is correct **(2)** Only **b** is correct

**(3)** Both are correct **(4)** Both are not correct

---

**22. Which of the following sentence is correct?**

**(1)** Zero rating schemes always been beneficial for free net surfing

**(2)** Net neutrality is novel method need to be supervise properly.

**(3)** Telecom companies are regulated hence not use data for more revenue generation than prescribed limit

**(4)** Indian telecom sector is most equalitarian sector for all participants.

---

KARVY'S INSTITUTE

**23. Which of the following point is clearly shown in DoT report?**

**(1)** Data piracy by the subretailers

**(2)** The problems of internet complexities

**(3)** Pre-selected bouquet of Zero rating sites

**(4)** Losses of consumer due to load of net neutrality

---

**24. What author tries tried to convey the message about critical condition of telecom sector in India ?**

**(1)** Focus on rationalization of the all elements

**(2)** Regulation of sector with more tighten rules

**(3)** Need more & more players to create healthy competition

**(4)** Need to protect consumer by provide free data more & more with less fee.

---

**25. A ने बंदुकीतुन झाडलेल्या 5 फै-यांमधून फक्त तिनच नेम पक्ष्यांना अचुक लागतात. तसेच B ने बंदुकीतून झाडलेल्या 3 फै-यांमधून 2 नेम पक्ष्यांना अचुक लागतात. जर B चे एकूण 27 नेम चुकले तर A चे किती नेम पक्ष्यांना अचुक लागले ?**

**(1)** माहीती पुरेशी नाही  **(2)** 30  **(3)** 60  **(4)** 72

---

**26. क्रिकेटच्या एका सामन्यात 5 फलंदाजांनी 36 च्या सरासरीने धावा काढल्या. D ने E पेक्षा 5 धावा ज्यास्त काढल्या. E ने A पेक्षा 8 धावा कमी काढल्या. D आणि E मिळून काढलेल्या धावा B ने काढलेल्या धावां इतक्याच होत्या. B आणि C यांच्या एकुण धावा 107 इतक्या होत्या. तर सामन्यात E ने किती धावा काढल्या ?**

**(1)** 62  **(2)** 45  **(3)** 28  **(4)** 20

---

**27. एक महिला म्हणाली. 'माझ्या वयाच्या अंकांची उलट केल्यास आलेली संख्या माझ्या पतिचे वय दर्शविते. ते माझ्यापेक्षा वयाने मोठे आहेत तसेच आमच्या वयातील फरक हा आमच्या वयाच्या बेरजेचा 1/11 एवढा आहे'. तर महिलेचे वय किती ?**

**(1)** 23 वर्षे  **(2)** 34 वर्षे  **(3)** 45 वर्षे  **(4)** यापैकी नाही.

---

**28. 180 रूपयांत विकत घेतलेल्या एका वस्तुची किंमत पुर्न विक्रिसाठी दुकानदार अश्या प्रकारे निश्चित करतो जेणे करून 20% ची सुट देऊन सुध्दा तो 20% नफा कमवितो. तर मालाची पुनविक्रिची किंमत किती ?**

(1) 270 रूपये  (2) 260 रूपये  (3) 245 रूपये  (4) 272 रूपये

---

KARVY'S INSTITUTE

**Paragraph 6**

The security legislation proposed by Japanese Prime Minister Shinzo Abe's administration moved a step closer to becoming law when Parliament's lower house approved it. The bills, which seek to rewrite the country's post-War pacifist security policy, are now before the upper house. Over a period of seven decades, Japan's security policy, shaped under a war-renouncing Constitution following the misadventures of the imperial regime, has been focused on self-defence. But the present bills seek to replace the self-defence doctrine with 'collective self-defence,' that would allow Japan to send troops abroad to rescue allies under attack. This big shift in approach makes the legislation controversial and unpopular. According to recent polls, only a quarter of the Japanese population supports the legislation. But Mr. Abe seems determined to take it forward.

This is mainly because of two inter-connected factors. First, Japan has come under huge pressure from the U.S. to revise its security doctrine. During Mr. Abe's visit to the U.S. in April 2015, both Japan and the U.S. announced new security guidelines which urged Tokyo to take 'more responsibility' in their bilateral security arrangement. Mr. Abe promised U.S. lawmakers to approve a new defence bill package 'by this summer'. This explains why the Prime Minister is in a hurry to get the bills passed despite opposition. Second, the nationalist politician that Mr. Abe is, sees it as a necessity to have an outward-looking security policy to contain China's rise. He had earlier proposed to have a 'strategic diamond' of four maritime democracies-Japan, the U.S., Australia and India – to counter Chinese influence in the Pacific. Mr. Abe has criticized China's territorial ambitions in the South China Sea, and Tokyo and Beijing have a dispute over islands in the East China Sea held by Japan. But the question is whether the move to reorient the pacifist security posturing, which ensured peace over the last seven decades when Japan rose as an economic powerhouse from the ruins of the Second World War, would help Tokyo address its security challenges, or lead to a flare-up of tensions in an already volatile East Asia. If the latter happens, that would create wrinkles in East Asian stability as the rivalry between China and Japan, that has historical dimensions, would worsen. That will not be in the interest of either Japan or Asia. Japan should also be wary of

KARVY'S INSTITUTE

joining the great game between the U.S. and China in the Pacific – one an existing super power and the other a rising super power. Instead, it should focus on solving its problems with China bilaterally, and work towards essential regional stability. For that to happen, the best way will be to continue its acclaimed policy of renunciation of war.

**29. Consider the following Statements?**

**(a)** Japanese constitution believed on the defensive policy in military area

**(b)** Japan is very small country with low population unable to attack strongly

**Alternate Answer Codes**

**(1)** Only **a** statement is correct

**(2)** Only **b** statement is correct

**(3)** Both statements are correct & statement **b** is reason of **a**

**(4)** Both statements are correct but statement **b** is not reason of **a**

---

**30. Why Japan wanted to change its pacifist defense policy ?**

**(a)** To control the marine area upto the south china sea.

**(b)** To build up security relations with china

**(c)** To make strategic relations with all countries of Japanese sea.

**(1)** Only a **(2)** Only a & b **(3)** Only a & c **(4)** None of Above

---

**31. Consider the following statements ?**

**(a)** South China sea is most crisis torn area in the world.

**(b)** Japan wanted to change defence policy for establish long lasting peace in south china sea based on mutual respect.

**Alternative Answers**

**(1)** Only **a** is correct **(2)** Only **b** is correct

**(3)** Both are correct **(4)** Both are not correct

---

**32. Why Japanece defense policy had been pacifist as per writer?**

**(1)** Japan is Buddhist country not believed in offensive activities

**(2)** Japan had not been any adverse relations at international level

**(3)** Japan made this policy on the bad past experience.

**(4)** Japanese constitution us itself pacifist constitution.

---

KARVY'S INSTITUTE

**33. Which of the following statement can be considered as correct inference from paragraph?**

**(1)** Pacifist defense policy is an outdated phenomenon

**(2)** Policy of materialism & stability always been give long term returns

**(3)** Strengthening defense is the hallmark of modern sovereign states.

**(4)** Need to established equally powerful bilateral world.

---

**परिच्छेद 7**

शांताचिया घरा, अद्‌भुत आला आहे पाहुणेरा ! जीव (अद्‌भुत) हा सद्‌गुरू (शांत) कडे पाहुणा म्हणून आला! शांत रसाचा स्थायीभाव काय आहे ? तर वैराग्य आणि अद्‌भुत रसाचा स्थायीभाव आहे आश्‍चर्य, कुतूहल! शद्‌गुरूंची पंहिली भेट कशामुळं होते ? मनात कुतूहल असतं ! पहिल्या भेटीला जाताना, अशी भावंना क्वचितच कुणाची असेल. जाऊ, दर्शन घेऊ, पाहू तरी कोण आहेत, कसे आहेत, आशीर्वाद घेऊ, दर्शनानं काय नुकसान होणार आहे ? साधारण असा पाहुण्यासारखा भाव असतो. पाहुणा कसा, काही काळापुरताच भेटीला येत असतो. जाऊ आणि त्यांचेच होऊन राहू, अशा भावनेनं पाहुणा भेटीला येत नाही ! अहो साईबाबांकडे एकजण आला, 'परब्रह्म दाखवा' म्हणून आला तोदेखील परतीच्या बोलीवर टांगा घेऊन ! बाबा परब्रह्म दाखवायला वेळ लावत आहेत आणि टांगेवाला ताटकळत आहे, ही मनात रूखरूख ! श्रीरामकृष्ण परमहंस म्हणत ना ? मिठाची बाहुली समुद्राची खोली पाहायला गेली आणि त्यातच विरघळून गेली. मग परब्रह्याच्या ख-या दर्शनानंही परब्रह्ममयताच येईल, हे परतीचा टांगा ठरवताना अभिप्रेत तरी होतं का ? आपलीही स्थिती अशीच असते नाही ? कुतूहलापोटी म्हणून, त्यांच्या आशीर्वादानं आपल्या संसारातल्या अडीअडचणी दूर झाल्याचं तर बरं आहे, या भावनेनं, साधू-संतांची दर्शनं घ्यावीत, या सुप्त संस्कारांमुळं जीव सद्‌गुरूंच्या दर्शनाला 'पाहुण्या'सारखा येतो. या भेटीचा मध्य काय आहे ? तर सद्‌गुरूंच्या सामर्थ्याची जाणीव त्याला होऊ लागते. प्रपंचातला प्रभाव लोपला नसतो. तरीही सद्‌गुरू त्याला अचूक मार्गदर्शनानं कृतीची प्रेरणा देऊन किंवा कधी अगदी अनाकलनीयरीत्या प्रपंचातील अडीअडचणींतून सोडवत असतात. प्रपंचात साधक बुडावा इतका तो सुधारून द्यावा, हा त्यांचा यामागे अंतस्थ हेतू नसतोच. जो अनासक्त भावान प्रपंचात राहातो आणि सद्‌गुरूकार्याला प्राधान्य देतो, त्याचा प्रपंच ते भरभराटीलाही आणतात. जसा ती भाऊ देसाईचा प्रपंच ! सर्वसामान्य जिवांना त्यांच्या त्यांच्या प्रपंचातली निर्विघ्यता आवडत असते. त्या आवडीतूनही सद्‌गुरू जेव्हा जिवाला सोडवतात तेव्हा हळुहळू त्यांचे विचार, त्यांचा हेतू, त्यांची आवड मलाही समजू लागते. जेव्हा आणि जसजसा त्यांच्या आणि माझ्या विचारातला, हेतूतला आणि आवडीतला भेद संपतो तेव्हा 'एकदशा' स्थिती येते. अर्थात ती एकदशा स्थिती झाली नसतानाही पंगतीला आलेल्या व-हाडयांनाही लेणीलुगडी मिळतात ! नवरा आणि नवरीचं लग्न होतं

KARVY'S INSTITUTE

पण म्हणून काही ते तात्काळ एकरूप होत नाहीत. एकरूपतेची प्रक्रिया दीर्घ असते. तरीही त्या लग्नात व-हाडयांचाही लाभ होतो. जीवभावात आलेल्या साधकांचे व-हाडी कोण आहेत ? तर उरलेले सात रस हे त्याचे आप्तजन. विविध मनोदशांमध्ये वावरणा-या या आप्तांचाही या भेटीमुळे लाभ होतो. खिळयाबरोबर त्याला लागून असलेल्या शेकडो टाचण्याही लोहचुंबकानं खेचून घ्याव्यात तसे सद्गुरू पंथाला लागलेल्या जिवाचे आप्तही या मार्गा कडे खेचले जातात !

**34. लेखकाने 'पाहुणा' ही संकल्पना कोणत्या दृष्टिकोनातून वापरली ?**

(1) मानवाची ईश्वराकडून त्वरीत लाभप्राप्तीची अपेक्षा करणे.

(2) देवदर्शनाला जाऊन त्वरीत स्वग्रानी परत येण्याची भक्ताची इच्छा

(3) भावनाविहीनतेसोबत देवदर्शन घेण्याची मानवाची अपेक्षा

(4) देवदर्शनापेक्षा प्रपंचात गुंतून रहाण्याचा मानवाचा मानस

---

**35. खालील विधाने लक्षात घ्या.**

(a) स्वतःच्या प्रपंचातील अडचणी दूर करण्याच्या हेतूने बरेच भक्त देवदर्शनाला जातात त्यामुळे त्यांना ईश्वरप्राप्ती होत नाही.

(b) ईश्वरप्राप्तीकरीता मानवास सन्यासच पत्करावे लागते.

**परिच्छेदाचे आकलनातून पर्यायी उत्तरे.**

(1) केवळ विधान a अचुक आहे (2) केवळ विधान b अचुक आहे

(3) दोन्ही विधाने अचुक आहेत. (4) दोन्ही विधाने अचुक नाहीत

---

**36. 'मिठाची बाहुली समुद्राची खोली पाहायला गेली आणि त्यातच विरघळून गेली' लेखकाने ही वाक्यरचना कोणता दृष्टीकोन समजवण्याकरीता वापरली ?**

(1) स्वार्थी मनुष्य स्वभाव हा नेहमीच विनाशाकडे जातो.

(2) मानवाने ईश्वर प्राप्तीची लालसा बाळगू नये.

(3) ईश्वराची प्रचिती ही अनंतकाळाच्या तपानंतरच शक्य आहे.

(4) ईश्वराच्या प्राप्तीकरीता मानवाची विद्वत्ता पराकोटीची असणे आवश्यक आहे.

---

**37. परिच्छेदातून लेखक काय सांगू इच्छितो ?**

(1) एकरूपतेची प्रक्रीया ही दिर्घकालीन असते म्हणून मानवाने शांतचित्ताने त्याच्या पुर्ततीकरीता प्रयत्न करावे.

(2) सामान्य व्यक्तीस परब्रम्हाचा साक्षात्कार त्याच्या स्वार्थापोटी होणे शक्य नाही.

(3) मानवजातीमध्ये काही अवगुणांचा प्रार्दुभाव झाल्यामुळे तो ईश्वरप्राप्तीपासून वंचीत रहातो.

(4) सदगुरूच्या भेटीला जातांना मानवाने परतीची अपेक्षा ठेवणे म्हणजे सदगुरूदर्शनास मुकणेच होय.

---

KARVY'S INSTITUTE

**संकेतांची उकल करून प्र.क्र. 38 आणि 39 ची उत्तरे दिलेल्या पर्यायांच्या आधारावर दया.**

**A @ B → A हा B पेक्षा मोठा आहे.**

**A = B → A आणि B समान आहेत.**

**A # B → A हा B पेक्षा लहान आहे.**

**A $ B → A हा B पेक्षा लहान नाही.**

**A % B → A हा B पेक्षा मोठा नाही.**

---

**38. E # F ; T $ E ; T = M**

**निष्कर्ष : (I) M % E (II) F @ M**

**(1)** फक्त निष्कर्ष (I) बरोबर आहे. **(2)** फक्त निष्कर्ष (II) बरोबर आहे.

**(3)** दोन्ही निष्कर्ष अयोग्य आहेत. **(4)** दोन्ही निष्कर्ष योग्य आहेत.

---

**39. T % Z ; X @ Q ; Z # Q**

**निष्कर्ष : (I) T @ X (II) X @ Z**

**(1)** फक्त निष्कर्ष (I) बरोबर आहे. **(2)** फक्त निष्कर्ष (II) बरोबर आहे.

**(3)** दोन्ही निष्कर्ष अयोग्य आहेत. **(4)** दोन्ही निष्कर्ष योग्य आहेत.

---

**40. दररोज 6 तास विश्रांती घेऊन सुध्दा वाळवंटात एका उंटाला एक विशिष्ट अंतर एका विशिष्ट गतीने पार करायला 48 दिवस लागतात. जर त्याने त्याची गति निम्मी आणि विश्रांतिची वेळ दुप्पट केली तर नियमित अंतराच्या अर्धे अंतर पार करायला त्याला किती दिवस लागतील ?**

**(1)** 66 **(2)** 72 **(3)** 76 **(4)** 68

---

**परिच्छेद 8**

गेली ३० वर्षे हिंसेचा पुरस्कार करून देश अस्थिर करण्याच्या प्रयत्नात असलेल्या नक्षलवाद्यांनी खडतर स्थितीत चिकाटीने वाटचाल करणे हा गुणविशेष चांगलाच अवगत केला आहे. सलग तीन दशके जंगलात राहून लढणे, ही निश्चितच सोपी गोष्ट नाही. मात्र त्यांच्या या चळवळीमुळे अनेकांचे जीवन उद्ध्वस्त झाले, हेही तेवढेच खरे. शस्त्रे हाती घेऊन जंगलात लढणारे आणि शहरात भूमिगत राहून चळवळीसाठी मनुष्यबळ पुरवणारे या दोहोंमध्ये चिकाटी हा गुण आहेच. पुण्यात अटक झालेल्या अरूण भेलकेकडे आता याच दृष्टिकोनातून बघण्याची गरज आहे. वारंवार पोलीस कारवाई होऊनही भेलके व त्याच्या साथीदारांनी चळवळ विस्ताराचा कार्यक्रम अजिबात थांबवलेला नाही. समाजातील उपेक्षित वर्गाला चळवळीशी जोडायचे असेल तर त्यांच्यासारखेच आयुष्य जगावे लागले, याची पूर्ण कल्पना असल्याने भेलके व त्याच्या साथीदारांचा आजवरचा प्रवास झोपडपट्टीतूनच झाला आहे. मात्र, या तरूणांकडे नक्षलवाद्यांनी विस्तारासाठी म्हणून दिलेला पैसासुद्धा भरपूर आहे, हे पोलिसांच्या

KARVY'S INSTITUTE

छाप्यांतून अनेकदा दिसून आले आहे. दीनदलित दुबळयांच्या हाती शस्त्रे दिल्याशिवाय या देशात काही घडूच शकत नाही, यावर ठाम विश्वास असलेल्या या तरूणांनी आजवर विदर्भातील अनेकांची आयुष्ये उद्ध्वस्त केली. आता त्यांनी मुंबई, पुण्याकडे केलेले कूच चिंतेत भर टाकणारे आहे. चळवळीवर नाराज असलेला तरूण क्रांतीच्या मोहात पडून शस्त्र तर हाती घेतो, पण आपण चुकलो, हे जेव्हा त्याच्या लक्षात येते तोवर वेळ निघून गेलेली असते. भेलके व कंपनीच्या आमिषाला बळी पडून चळवळीत दाखल झालेले, पण नंतर भ्रमनिरास झालेले व मूळ प्रवाहात परत आलेले अनेक तरूण आज विदर्भात आहेत. आता चांगले आयुष्य जगू, असा विचार जरी या तरूणांनी केला असला तरी त्यांच्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन पार बदलला आहे. या देशात हिंसेद्वारा क्रांती कधीच यशस्वी होऊ शकत नाही, याचे भान व्यवस्थेवर नाराज असलेल्या अनेकांना नाही, त्याचा फायदा घेऊन भेलके व कंपनीचा मनुष्यबळ विस्ताराचा कार्यक्रम जोरात सुरू आहे, हेच पुण्यातील कारवाईतून दिसून आले. समाजातील उपेक्षितांवर होणारा अन्याय, ही चिंतेची बाब आहे. तो दूर व्हावा, यासाठी सनदशीर मार्गाने लढता येते. ते सोडून हिंसेचा मार्ग स्वीकारणे हे योग्य नाही. नक्षलवाद्यांना बळ देण्याच्या प्रयत्नात भेलके व त्याचे साथीदार आजवर हेच करीत आले आहेत. गरीब व उपेक्षितांचे प्रश्न हाती घेऊन सरकारविरूध्द लढण्याची भाषा करणा-या नक्षलवाद्यांचा उद्देश राजकीय आहे. त्यांच्या राजकीय व्यवस्थेत लोकशाहीला स्थान नाही. या व्यवस्थेत विरोध दर्शवण्याला सुध्दा जागा नाही व मतस्वातंत्र्याला मोकळीक नाही, हे वास्तव या चळवळीच्या नादी लागणा-यांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. आजवर आदिवासी व आता दलितांचे पाठीराखे आहोत, असे भासवत आपला राजकीय कार्यक्रम पुढे नेण्याचे नक्षलवाद्यांचे डावपेच आता लपून राहिलेले नाहीत. माओचा विचार हेच अंतिम सत्य, अशी या चळवळीची भूमिका राहिलेली आहे. अशा वेळी डॉ.आंबेडकरांनी देशाला दिलेल्या राज्यघटनेचे काय, या प्रश्नाचे उत्तर नक्षलवाद्यांकडे नाही, ही बाब दलित तरूणांनी लक्षात घ्यावी. भेलके व त्याचे साथीदार वारंवार कारवाई होऊनसुध्दा बनावट नावे घेऊन तेच काम करीत राहतात, पण त्याला प्रभावीपणे प्रत्युत्तर देण्याच्या भानगडीत आपल्या व्यवस्थेतील यंत्रणा पडत नाहीत. या तरूणांकडून मांडला जाणारा विचार देश तोडणारा आहे हे वास्तव आपल्या तरूणाईपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्नही कुनी करीत नाही. शेवटी, विचाराची लढाई विचारानेच लढावी लागेल. नक्षलवाद्यांच्या डावपेचात विचारासोबत हिंसेलासुध्दा जागा ठेवण्यात आलेली आहे. हिंसेचा प्रतिकार करणारी पोलीस, सरकार नावाची यंत्रणा आपल्याकडे आहे, पण वैचारिक प्रतिवाद कुणी करायचा, यावर मात्र कुणीही पुढाकार घेताना दिसत नाही. त्यामुळे भेलके व कंपनीचे आजवर फावत आलेले आहे.

**41. खालीलपैकी अचुक विधाने कोणती ?**

**(a)** नक्षलवाद्यांना खडतर जीवन जगण्यास बाध्य केले जाते.

**(b)** शोषणामुळे हिंसाचारास वाव मिळतो.

**(c)** तरूणांस सशस्त्र क्रांती आवडते

**(1)** केवळ a **(2)** केवळ a व b **(3)** केवळ a व c **(4)** यापैकी नाही.

KARVY'S INSTITUTE

**42. खालीलपैकी अचुक विधाने कोणती ?**

**(a)** हिंसात्मक क्रांती अन्यायाविरूध्दाचे एक शस्त्र म्हणून वापरले जाते.

**(b)** अहिंसात्मक क्रांतीचा मार्ग हा सनदशीर मार्ग होऊ शकतो.

**(c)** विचारांची लढाई ही कोणताही उद्देश सफल करू शकत नाही.

**(1)** केवळ a **(2)** केवळ a व b **(3)** केवळ a व c **(4)** यापैकी नाही

---

**43. लेखक नक्षलवादी चळवळीबाबत कोणते मत मांडतो ?**

**(a)** समाजक्रांतीप्रेरीत चळवळ **(b)** कट्टरतावादी चळवळ **(c)** एक वैचारिक चळवळ

**(1)** केवळ a **(2)** केवळ a व b **(3)** केवळ b व c **(4)** वरील सर्व

---

**44. लेखक नक्षलवाद्यांविरूध्द कोणती लढाई परिणामकारक ठरेल असे सांगतो ?**

**(1)** सबळ प्रशासकीय यंत्रणा विकसित करून

**(2)** गरीब जनतेचा नक्षलवाद्यांप्रतीच्या आस्थेचा भ्रमनिरास करून

**(3)** सक्षम पोलिस यंत्रणा तळागाळापर्यंत पोहचवून

**(4)** वैचारिक लढाई लढून

---

**45. परिच्छेदावरून काय बोध मिळतो ?**

**(1)** रक्तरंजित क्रांती लोकशाही क्रांतीपेक्षा श्रेष्ठ होऊ शकत नाही.

**(2)** नक्षलवाद्यांची योजना प्रशासकीय यंत्रणेसमोर सफल होऊ शकत नाही.

**(3)** गरीबीनिमूलनातून नक्षलवाद्यांचा नायनाट करता येऊ शकतो.

**(4)** शासन नक्षलवाद्यांच्या विचारांना प्रतित्युर देण्याच्या भानगडीत पडत नसते.

---

**परिच्छेद 9**

पृथ्वीवरच्या पहिल्या सजीवाची निर्मिती ही जीवशास्त्रीय नव्हे तर रासायनिक प्रक्रियांमधून झाली आहे. जवळपास साडेचार हजार दशलक्ष वर्षांपूर्वी सुर्यापासून पृथ्वी आणि सुर्यमालेतील इतर ग्रहांची निर्मिती झाली. तेव्हा अर्थातच पृथ्वीवर सजीवांचं अस्तित्व नव्हतं. त्यावेळी पृथ्वीच्या वातावरणात सर्वाधिक प्रमाणात असणा-या हायड्रोजनची पृथ्वीवरच्या वातावरणातल्या नायट्रोजन, ऑक्सिजन आणि कार्बन डायऑक्साइड यांच्याबरोबर अभिक्रिया होत गेली आणि पृथ्वीवर अमोनिया, मिथेन, पाणी यासारखी संयुगं तयार होत गेली. त्या वेळी पृथ्वीच्या वातावरणात मुक्त ऑक्सिजन नव्हताच. त्यामुळेच या तयार होत गेलेल्या संयुगांचं ऑक्सिडीकरण न होता त्यांच्यापासून पुढे इतर रासायनिक पदार्थांची निर्मिती शक्य झाली.

KARVY'S INSTITUTE

सूर्यप्रकाशातले, अतिनील किरण, आकाशात चमकणा-या विजा, ज्वालामुखीच्या उद्रेकांमधून बाहेर टाकली जाणारी उष्णता यांच्या एकत्रित परिणामातून अमोनिया, मिथेन, पाणी यांच्यापासून अमिनो आम्ल, डीएनए, आरएनए यांसारखी जटिल रसायनं निर्माण झाली. पावसाच्या पाण्याबरोबर ही रसायनं समुद्राच्या पाण्यात जाऊन मिसळली.

त्या वेळी समुद्राच्या पाण्याचं तापमान हे सध्याच्या समुद्राच्या पाण्याच्या तापमानापेक्षा खूपच जास्त होतं. त्या विशिष्ट तापमानाला वेगवेगळया रासायनिक अभिक्रिया घडून आल्या आणि त्यामधून अधिकाधिक क्लिष्ट रचना असलेले रेणू तयार झाले. डीएनए आणि आरएनए रेणूंमध्ये स्वत:सारखेच रेणू तयार करण्याची क्षमता होती. या अभिक्रियांदरम्यान डीएनए रेणूंभोवती मेदाचे आवरण तयार होऊन पेशीसदृश रचना अस्तित्वात आली. ही रचना इतकी साधी होती की, सध्या पेशींची रचनासुद्धा त्याहून कितीतरी क्लिष्ट आहे.

मेदाचं आवरण असलेल्या पेशीसदृश रचनेत हळूहळू बदल होत गेले. त्यातूनच पुढे क्लोरोफिल रेणूचं अस्तित्व असणा-या पेशी निर्माण झाल्या. या पेशींना प्रकाशसंश्लेषण प्रक्रिया करून पेशीमध्येच ग्लुकोजची निर्मिती करणं शक्य झालं. प्रकाशसंश्लेषण प्रक्रियेतून वातावरणामध्ये मुक्त ऑक्सिजन बाहेर टाकला जाऊ लागला. जेव्हा प्रकाशसंश्लेषण करणा-या अशा एकपेशीय जीवांच्या संख्येत वाढ होत गेली, तेव्हा वातावरणातल्या मुक्त ऑक्सिजनचं प्रमाण वाढलं. त्यामुळे ऑक्सिजनच्या साह्याने श्वसन करणा-या सजीवांची उत्पत्ती शक्य झाली.

**46. भारतामध्ये जेनेरिक औषधाबाबत काय परिस्थिती दिसून येते ?**

**(a)** सामान्य जनता जेनेरिक औषधांबाबत शासंक असतात.

**(b)** जेनेरिक औषधे डॉक्टर देण्यास इच्छुक नाहीत.

**(c)** जेनेरिक औषधांचा दर्जा नाही.

**(1)** केवळ a **(2)** केवळ a व b **(3)** केवळ c **(4)** वरील सर्व

---

**47. जेनेरिक औषधांची भारतात उपयोगीता वाढण्यामागे कोणती अडसर दिसून येतो ?**

**(a)** जेनेरिक औषधांचे प्रचलित ब्रॅंड नाही.

**(b)** जेनेरिक औषधांच्या दर्जा तपासण्याकरीता नियमे बरीच शिथिल आहेत.

**(c)** या औषधांमध्ये मोजक्याच लोकांची मक्तेदारी आहे.

**(1)** केवळ a **(2)** केवळ a व c **(3)** केवळ b **(4)** वरील सर्व

---

**48. खालीलपैकी अचुक विधाने कोणती ?**

**(a)** जेनेरिक औषधे ही औषधातील बडया कंपन्याची नफाखोरी मोडून काढण्यास अपयुक्त आहेत.

**(b)** जेनेरिक औषधामुळे सर्वसामान्य जनतेस आरोग्यास हितकारक औषधांचा दर्जा उंचावेल.

**(c)** जेनेरिक औषधे खेडया – पडयांत स्वस्त खर्चात बनविले जातात.

**(1)** केवळ a व b **(2)** केवळ a व c **(3)** केवळ b व c **(4)** केवळ c

---

KARVY'S INSTITUTE

**49. खालील विधाने लक्षात घ्या.**

(a) जेनेरिक औषधे सामान्य व्यक्तींचा आरोग्याचा अधिकारास दुजोरा देण्याचे उत्तम माध्यम आहे.

(b) जेनेरिक औषधांमुळे सामान्य माणसांची औषधबाजारातील बडया कंपन्यांनी मांडलेली लुट थांबेल.

**पर्यायी उत्तरे**

(1) केवळ **a** अचुक आहे (2) केवळ विधान **b** अचुक आहे

(3) दोन्ही विधाने अचुक आहेत. (4) दोन्ही विधाने अचुक नाहीत

---

**50. A आणि B यांचे मासीक वेतन 5 : 4 या प्रमाणात आहे. A त्याच्या मासीक पगारातून 3/5 पगार आईला देतो, 15% पगार बहीणीच्या शिकवणी वर्गासाठी देतो, 18% पगार कर्जाच्या हफ्त्याच्या रूपात देऊन उरलेले 2100 रूपये स्वत:साठी खर्च करतो तर B चे मासिक वेतन किती ?**

(1) 25000/- (2) 24000/- (3) 23000/- (4) 22000/-

---

**दैनंदिन जिवनातील वास्तवाशी विसंगत वाटत असली तरी खालील विधाने खरी मानुन योग्य अनुमान निवडा आणि प्र.क्र. (51) आणि (52) ची उत्तरे द्या.**

**51. विधाने : रवि उंच आहे.**

**एकही उंच व्यक्ती गोरा नाही.**

**सगळी गोरी माणसे ठेंगणी आहेत.**

**अनुमान : (I) रवि गोरा नाही**

**(II) सगळी ठेंगणी माणसे गोरी आहेत.**

**(III) रवि काळा आहे.**

(1) फक्त अनुमान (I) तर्कसंगत आहे. (2) फक्त अनुमान (II) तर्कसंगत आहे.

(3) फक्त अनुमान (III) तर्कसंगत आहे. (4) फक्त अनुमान (I) आणि (II) तर्कसंगत आहे.

---

**52. विधाने : सगळे रूपये सिक्के आहेत.**

**सगळे सिक्के टंकसाळेतिल आहेत.**

**कुठलीही टंकसाळ छोटी नाही.**

**अनुमान : (I) सगळे रूपये टंकसाळेतिल आहेत.**

**(II) एकही रूपया टंकसाळेतील नाही.**

**(III) कुठलाही सिक्का छोटा नाही.**

(1) फक्त अनुमान (I) तर्कसंगत आहे. (2) फक्त अनुमान (II) तर्कसंगत आहे.

(3) फक्त अनुमान (I) आणि (II) तर्कसंगत आहे. (4) सर्व अनुमान तर्कसंगत आहेत.

---

KARVY'S INSTITUTE

**53. प्रश्नचिन्हाच्या जागी येणारी संख्या ओळखा.**




**(1)** 62 **(2)** 126 **(3)** 87 **(4)** 132

---

**परिच्छेद 10**

गरिबांना न्याय उशिरा मिळतो, असे म्हणतात. त्याच पद्धतीने भारतातील जेनेरिक औषधांच्या मागणीकडे पाहायला हवे. तिकडे धनिकांच्या अमेरिकेत सर्वच औषधे त्यांच्या मूळ (जेनेरिक) नावाने उपलब्ध आहेत. इथे गरिबांच्या भारतात मात्र औषधांच्या ब्रॅण्डच्या नावाचा बोलबाला आहे. महत्वाचे म्हणजे आपल्याकडे कंपन्यांच्या नावाच्या वेष्टनात गुंडाळून येणारी हीच औषधे युरोप-अमेरिकेत मात्र जेनेरिक नावाने याच कंपन्यांकडून निर्यात केली जातात. हा तिढा सोडवण्यासाठी दशकभराहून अधिक काळ मागणी सुरू आहे. जेनेरिक औषधांचा पुरस्कार करायला हवा, याबाबत सर्वच सरकारी यंत्रणा व डॉक्टर वरकरणी समर्थन करतात. मात्र प्रत्यक्षात गब्बर होत असलेल्या औषध कंपन्या, त्यांच्या जिवावर परदेशवारीसह अनेक भेटवस्तूंचे लाभार्थी होणारे काही डॉक्टर आणि कमालीचे 'मार्जिन' मिळणारे औषध विक्रेते यांच्या आपसातील छुप्या युतीमुळे रूग्णांना डॉक्टरांना लिहून दिलेल्या कंपन्यांचीच 'ब्रॅंडेड' औषधे घेणे भाग पडते. या सगळयाला अर्थातच आतापर्यंत सरकारकडून फारसा विरोध नव्हता. ब्रॅंडेड औषधावर त्याचे जेनेरिक नाव लिहिले की झाले, असे आपल्याकडे नियम. त्यामुळे कंपन्यांची नावे हेच औषध असल्याचा समज औषधभान नसलेल्या समाजापर्यंत पोहोचला. पण औषध कंपन्यांची मक्तेदारी मोडून सर्वसामान्यांना जेनेरिक औषधांचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारने उशिरा का होईना, पण एक पाऊल पुढे टाकले. या संदर्भात केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब मंत्रालयाने इंडियन मेडिकल असोसिएशनशी चर्चा करून अधिसूचना प्रसिध्द केली. यामधील डॉक्टरांच्या केवळ औषधविक्रेत्यांनाच कळणा-या गिचमिड अक्षरांऐवजी सुटसुटीत, सुस्पष्ट कॅपिटल अक्षरांमधून औषधाचे नाव रूग्णाला लिहून द्यावे ही सूचना डॉक्टरांनी मान्य केलेली आहे. मात्र औषधांचे मूळ रासायनिक नाव म्हणजेच जेनेरिक नाव लिहून देण्याबाबत अजूनही मतमतांतरे आहेत. यात औषध कंपन्यांशी असलेल्या व्यवहारातील आर्थिक मलिद्याचा भाग मुख्य असला तरी जेनेरिक औषधांच्या दर्जा बाबत डॉक्टरांनी उपस्थित केलेले प्रश्नही दुर्लक्षित करण्यासारखे नाहीत. मुळात भारतात आजमितीला जी औषधे आहेत त्यातील बहुतांश जेनेरिकच आहेत. प्रश्न आहे तो दर्जाचा. कंपन्या ही औषधे युरोप-अमेरिकेत निर्यात करताना तेथील एफडीए च्या म्हणजे अन्न व औषध प्रशासनांच्या कडक नियमाचे पालन करतात. भारतात मात्र

KARVY'S INSTITUTE

अन्न व औषध प्रशासनाचा वचक नाही. वसई, उल्हासनगर किंवा उत्तर प्रदेशमधल्या एखाद्या खेडयात तयार होणा-या औषधांच्या दर्जाबाबत आम्ही कशी काय हमी देणार, असा डॉक्टरांचा सवाल आहे. थेट रूग्णांच्या जिवाशीच सामना असल्याने माहिती असलेल्या ब्रॅण्डवर विश्वास ठेवला जातो, हे जेनेरिक औषधांचा पुरस्कार करणारे डॉक्टरही कबूल करतात. त्यामुळे जोपर्यंत एफडीएकडून नियमांची काटेकोर तपासणी व अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत सरसकट औषधे उपलब्ध होणे धोकादायकच आहे. अर्थात यामुळे जेनेरिकचा पर्याय नाकारणे म्हणजे पिकात माजलेल्या तणापायी उभे शेत जाळून टाकण्यासारखे आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या या अधिसूचनेबाबत सर्वसामान्य व तज्ज्ञांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला तर कमी किमतीतील योग्य औषधे निवडण्याचा पर्याय भारतीयांना उपलब्ध होऊ शकेल. त्यामुळे जेनेरिक औषधांच्या शिफारशीचे स्वागतच व्हायला हवे.

**54. परिच्छेदाच्या अवलोकनातून खालीलपैकी अचुक विधाने निवडा ?**

**(a)** संजीव निर्मिती एक क्लिष्ट प्रक्रीयेतून सरल प्रक्रीयेतील रूपांतर होय

**(b)** ऑक्सिडीकरणाची प्रक्रीया इतर रासायनिक पदार्थांच्या निर्मितीस बाधक ठरते.

**(c)** एकपेशीय प्राणी पृथ्वीवर प्रथमत: उदयास आले.

**(1)** केवळ a **(2)** केवळ a व b **(3)** केवळ a व c **(4)** यापैकी नाही.

---

**55. खालीलपैकी अचुक विधाने कोणती ?**

**(a)** पृथ्वीवर हायड्रोजनचे प्रमाण अधिक असल्याने तीच्या विकासाच्या प्रथम टप्प्यात ऑक्सिजन उपलब्ध नव्हता.

**(b)** रासायनिक अभिक्रीयेतून कठीण संरचना घडतात.

**(c)** सजीवाची उत्पत्ती प्रथमत: मेदापासून झाली.

**(1)** केवळ a **(2)** केवळ a व b **(3)** केवळ b **(4)** केवळ a व c

---

**56. खालील विधाने लक्षात घ्या.**

**(a)** पृथ्वीवर प्रथमत: एक्येशीय प्राण्यांची उत्पत्ती होऊ शकली नाही.

**(b)** पृथ्वीच्या विकासाच्या प्रथम टप्प्यामध्ये पृथ्वीवर मुक्त ऑक्सिजन अस्तित्वात नव्हते.

**पर्यायी उत्तरे**

**(1)** दोन्ही विधाने अचुक असून विधान **b** हे विधान **a** चे कारण आहे.

**(2)** दोन्ही विधाने अचुक आहेत, परंतु विधान **b** हे **a** चे कारण नाही.

**(3)** केवळ विधान **a** अचुक आहे.

**(4)** केवळ विधान **b** अचुक आहे.

---

KARVY'S INSTITUTE

**57.** **परिच्छेदावरून सृष्टीच्या विकासामध्ये खालीलपैकी कोणती बाब संयुक्तिक आहे ?**

**(a)** शीघ्रबदल **(b)** जैव – रासायनिक प्रक्रीया **(c)** उत्क्रांती

**(1)** केवळ a **(2)** केवळ a व b **(3)** केवळ b व c **(4)** केवळ c

---

**58.** **एक व्यवस्थापन यंत्र संख्या आणि शब्दांच्या इनपुटला एका विशिष्ट नियमानुसार पुर्नव्यवस्थापित करते.**

**उदा.**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Input** | : | the | 23 | each | 31 | second | 25 | left | 36 |
| **Step I** | : | the | each | 23 | 31 | second | left | 36 | 25 |
| **Step II** | : | the | each | left | 23 | 31 | second | 25 | 30 |
| **Step III** | : | the | each | left | second | 31 | 25 | 36 | 23 |
| **Step IV** | : | the | each | left | second | 25 | 36 | 23 | 31 |

**चरण IV या इनपुटचा अंतिम चरण आहे. या यंत्रामध्ये be 11 all 25 main 47 81 equal 49 earn 16 ant हा इनपुट दिल्यास चरण IV मध्ये 'ant' आणि 'equal' यांच्यामध्ये किती संख्या / शब्द आहेत ?**

**(1)** 3 **(2)** 4 **(3)** 5 **(4)** 6

---

**59.** **93 कि.मी.प्रती तास वेगाने चालत असलेली पहिली ट्रेन विरूध्द दिशेहुन 51 कि.मी. प्रति तासाने येत असलेल्या आणि स्वत:पेक्षा लांबीने अर्ध्या असलेल्या दुसया ट्रेनला 24 सेंकदात पुर्णपणे पार करते. त्या नंतर तिच ट्रेन (पहिली) एका पुलाला 66 सेकंदांत पार करत असल्यास पुलाची लांबी किती ?**

**(1)** 1065 Mtr. **(2)** 1060 Mtr. **(3)** 1055 Mtr. **(4)** 1050 Mtr.

---

**60.**




**5 च्या विरूध्द पृष्टावर कोणता अंक आहे ?**

**(1)** 4 **(2)** 2 **(3)** 1 **(4)** 6

---

**61.** **कॉपर आणि झिंक मिश्रित एका 400 gm वजनाच्या P गोलकामध्ये कॉपरचे प्रमाण 60% आहे. कॉपर आणि झिंक चे मिश्रण असलेल्या आणखी एक गोलक Q आधिच्या (P) गोलकासोबत वितळून 1 kg वजनाचा एक नविन गोलक तयार केला असता त्यात कॉपरचे प्रमाण 66% होते. तर गोलक Q मध्ये कॉपरचे प्रमाण किती होते ?**

**(1)** 60% **(2)** 71% **(3)** 72% **(4)** 70%

---

KARVY'S INSTITUTE

**परिच्छेद 11**

शेतकरी महिला आघाडीला स्वरूप प्राप्त झाले ते चांदवडच्या अधिवेशनाच्या पूर्वतयारीपासून. १९८५ते ८६ मध्ये निखळ स्त्री-प्रश्नांची चर्चा, माहिती व बारकावे समजून घेणे हेच काम या आघाडीने केले. प्रत्यक्षपणे बंद खोलीच्या चर्चेत जे साध्य झाले, ते सभा, संमेलनातून साध्य होणे कठीण होते; कारण या चर्चेत अगदी मनमोकळी मांडणी या स्त्रिया करीत आणि शेतकरी संघटनेच्या आर्थिक आंदोलनाची विश्वासार्हता असल्यामुळे आपले प्रश्न नक्की सुटतील, या विश्वासाने या चर्चा घडू लागल्या. सुरूवातीच्या एक-दोन बैठकांत स्त्री म्हणून आपले काही प्रश्न आहेत, या मांडणीवरच त्यांच्या डोळयांत अविश्वास दिसत होता. स्त्रीच्या अडचणी या सांसारिकच आहेत, या असणारच, अशीच त्यांची धारणा. आपले स्वतंत्र असे व्यक्तिमत्व आहे हा विचार, तर त्यांना त्याहून न पेलणारा होता. संसारात रमायचे, घरच्यांसाठी जगायचे, कष्ट करायचे यातच सार्थक. नवीन जिवाची निर्मिती नैसर्गिकच आहे, तेव्हा ते 'देवाची देन' म्हणून स्वीकारायचे. समाजाच्या चाकोरीत गरगरत जगणे हेच जिणे. स्वातंत्र्य म्हणजे व्यभिचार. स्वतंत्र विचार करणे म्हणजे कुटुंबाशी (भांडण) प्रतारणा करणे ठरेल, संसाराचा रथ मोडणारे ठरेल, अशा संकल्पनेत वावरणारा ग्रामीण स्त्री-समाज स्त्री-मुक्तीपासून मैलोगणिक दूर असलेला जाणवत होता. स्त्री-मुक्ती म्हणजे संसाराचा विचका, घरादारापासून तोडणारा विचार, असेच काहीसे मत ऐकायला मिळत असे.

मोठया चिकाटीने या चर्चा घडत असत आणि यातूनच स्त्रियांच्या ख-या मनाचे, विचाराचे दर्शन घडत होते. स्त्री-शिक्षण, मार्क्सवादी महिला संघटना, स्त्री-मुक्तीवादी संघटना या जणू काही आमच्याशी संबंधितच नाही, अशा प्रकारची चर्चा घडत असे. स्त्रीला शिकून काय करावयाचे ? शेवटी 'चूल आणि मूल' हेच नशिबी. सुशिक्षित स्त्री या चूल-मूल चक्रातही स्वत:चे वेगळे स्थान निर्माण करू शकते, ही जाणीव या चर्चेतून दिली गेली. मार्क्सवादी महिला मोर्चा म्हणजे महिला कामगारांचेच विश्व, या विचारातूनसुध्दा त्यांना बाहेर काढण्यात शेतकरी महिला आघाडीला यश आले. स्त्री-मुक्ती म्हणजे स्त्री-पुरूष असा उभा द्वेष नव्हे, याची मांडणी शेतकरी महिला आघाडीने अतिशय प्रभावीपणे या चर्चेमध्ये केली. स्वत:चे आरोग्य, जीवनमान, अधिकार, स्वत:चे समाजातील स्थान या सर्व गोष्टी त्यांच्या गावीही कधी नव्हत्या, अशी स्थिती या ग्रामीण स्त्रीची होती. त्यांच्या भावभावना, कुटुंबवत्सलता जपून त्या स्त्रीला समर्थपणे उभे राहण्याचे मार्गदर्शन शेतकरी महिला आघाडीने केले. याकरीता सतत शिबिरांचे आयोजन करण्यात आले. स्त्री-पुरूष हे परस्परपूरक आहेत, स्त्रीच्या स्वातंत्र्यात पुरूषाचे हित अधिक आहे, संसार जर फुलायचा असेल, तर जोडीदाराला बरोबरीचा अधिकार असणे किती गरजेचे आहे, हे पुरूषांनासुध्दा सांगण्यात आले. नव्हे, त्याची जाणीव करून देण्यात आली. या सर्व चर्चा व जाणिवांतून एकप्रकारचा विश्वास ग्रामीण स्त्रीमध्ये व पुरूषांत निर्माण झाला. (इथे पुरूषांचा आवर्जून उल्लेख करते; कारण भारतीय स्त्री ही 'कुटुंबाशिवाय' विचारच करणे कठीण आहे. पुरूषांची मानसिकता जर बदलली, तर स्त्री स्वत: चे विश्व सहज निर्माण करू शकेल.) ग्रामीण स्त्रीला कुटुंबात बरोबरीचे स्थान मिळणे शक्य झाले. निदान स्त्री हीसुध्दा माणूस आहे हि भावना

KARVY'S INSTITUTE

ग्रामीण पुरूष समाजात रूजवण्यात शेतकरी महिला आघाडीला यश मिळाले. याची पावती याच स्त्री-पुरूषांकडून अनेक दौ-यांच्यावेळी मिळत असते. 'ताई आमच्या बाईला आयता चहा दिला बरं!' सांगण्यात त्यांच्या मनात कुठलाही प्रतिकार नसतो, उलट दोघांचे चेहरे आनंदाने डवरलेले असतात. बाईलाही मन असते, तिलाही भावना असतात, आपल्या तुटपुंज्या मिळकतीच्या विवंचनेत व ढोर कष्टांत हा विचार मनात कधी आलाच नाही, त्यामुळे आर्थिक, मानसिक व सामाजिक बांधिलकी असलेला समाज घडला नाही, घर बनले नाही, कुटुंब तयार झाले नाही. केवळ समाजाची रूढी म्हणून लग्न, कुटुंब आणि घर; परंतु या घरात लग्नानंतरची हौसमौज नाही, कुटुंबाचे कोडकौतुक नाही. मुलीचा जन्म म्हणजे कष्ट, मन मारून जगणे. माहेरी देखील ओझे; कारण उजवायचे आहे म्हणून आणि सासरी तर आनंदीआनंद; कारण शेती तोटयात आहे. घरंदाज स्त्रिने आपले दु:ख केवळ चुलीजवळ सांगायचे. ' या सर्व यातनाही नको व स्त्री-जन्मही नको,' या विचाराप्रत ग्रामीण स्त्री-समाज पोचला होता.

**62. शेतकरी महीला आघाडीने कोणती बाब स्पष्टपणे मांडली ?**

(1) लैंगिक समानता (2) वैचारिक समता

(3) स्त्री मुक्ती मार्ग (4) ग्रामीण दु:खी जीवन

---

**63. शेतकरी महीला आघाडी चे यश कशात दिसते ?**

(1) स्त्रीक्रांतीचे बीज रोवून पुरूषप्रधान संस्कृतीचा विमोड करण्याची सुरूवात केली.

(2) स्त्रीला चुल आणि मुल या संकुचित चाकोरीमधून मुक्त केले.

(3) पुरूषी समाजात स्त्री प्रती मानवीयता निर्माण केली.

(4) स्त्री शक्तीचा विकास करून समतावादी समाज स्थापन करण्याचा प्रयत्न केला.

---

**64. ग्रामीण स्त्री समाजात 'स्त्री जन्म नको' असा विचार का पसरला ?**

(1) ग्रामिण भागात स्त्रीला वाडीत टाकले जाते.

(2) स्त्रीमनास येथे जागा नाही.

(3) ग्रामिण भाग अत्यंत गरीब आहे.

(4) स्त्रीयांना शहरामधील सुखसुविधा प्राप्त होत नाही.

---

**65. ग्रामिण समाजात स्त्री मुक्ती बाबत कोणता संभ्रम आहे ?**

(1) स्त्रीमुक्ती ही सामाजिक विघटनाची प्रक्रीया आहे.

(2) स्त्रीमुक्ती अभिव्यक्ती स्वातंञ्याच्या विरोधात आहे.

(3) स्त्रीमुक्ती स्त्री स्वातंत्र्य चाकोरीबध्द करेल

(4) स्त्रीमुक्ती म्हणजे लैंगिक समानता.

---

KARVY'S INSTITUTE

**66. परिच्छेदाचे आकलनावरून काय स्पष्ट होते ?**

**(1)** स्त्री मुक्ती तळागाळांपर्यंत शक्य आहे .

**(2)** कुटुंबव्यवस्थे विरूध्द विद्रोह म्हणजेच स्त्री मुक्ती

**(3)** ग्रामीण भागात स्त्री मुक्ती चळवळ कमकुवत आहे .

**(4)** पुरूष प्रधान व्यवस्था स्त्री मुक्ती चळवळीस धोका मानीत नाहीत .

---

**67. 12 पुरूष आणि 16 मुलांना एक काम पुर्ण करायला 5 दिवस लागतात . तेच काम 4 दिवसांत पुर्ण करायचे असल्यास 13 पुरूष आणि 24 मुलांची मदत घ्यावी लागते . तर 7 पुरूष आणि 10 मुलांना ते काम पुर्ण करायला किती दिवस लागतील ?**

**(1)** 2 1/3 दिवस **(2)** 5 1/2 दिवस **(3)** 4 5/2 दिवस **(4)** 8 1/3 दिवस

---

**68. दिलेल्या अंकांच्या मालिकेतील विसगंत मालिका ओळखा ?**

**(1)** 22 – 158 + 260 ÷ 5 + 26 x 3 + 12

**(2)** 666 – 333 + 999 ÷ 9 – 88 x 5

**(3)** 840 + 650 – 12 x 8 ÷ 72 x 96 – 1356

**(4)** 2112 ÷16 + 128 x 3 – 170 x 3

---

**69. सहा मित्र A, B, C, D, E आणि F एका षटकोणाकार टेबलाभोवती बसलेले आहेत . F हा D आणि C च्या मध्ये बसलेला आहे . A हा B किंवा C चा लगतचा शेजारी नाही . D हा C किंवा E चा लगतचा शेजारी नाही . B आणि C लगतचे शेजारी आहेत . षटकोणाकार टेबलाच्या सहाही बाजू सारख्याच लांबीच्या असल्यास**
**यापैकी कोण लगतचे शेजारी नाहीत .**

**(1)** A आणि F **(2)** D आणि F **(3)** B आणि E **(4)** C आणि F

---

**70. दिलेल्या विधानाचा विचार करा .**

**(a)** J आणि K सारख्या वयाचे आहेत किंवा J हा K पेक्षा मोठा आहे .
**(b)** L आणि M सारख्या वयाचे आहेत किंवा M हा L पेक्षा मोठा आहे .
**(c)** K हा L पेक्षा मोठा आहे .

या विधानावरून कोणता निष्कर्ष नियमितपणे काढता येतो .

**(1)** J हा K पेक्षा मोठा आहे . **(2)** K हा M सारख्या वयाचे आहेत .
**(3)** K हा M पेक्षा मोठा आहे . **(4)** J हा L पेक्षा मोठा आहे .

---

KARVY'S INSTITUTE

**परिच्छेद 12**

दहशतवादात दोन प्रमुख विभाग पडू शकतात हे गुन्हेगारीशास्त्राच्या अभ्यासावरून दिसून येते. पहिला विभाग देशांतर्गत दहशतवाद; जो आत्ताच आपण वरील 'टोळी युध्दे' या पोटभागात पाहिला. दुसरा विभाग आंतरराष्ट्रीय दहशतवाद. देशांतर्गत दहशतवादाचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा प्रांतांतर्गत दहशतवादाचाही ओझरता विचार करावाच लागतो. उदाहरणेच द्यायची झाल्यास पंजाबात काही वर्षापूर्वी उफाळलेला सुवर्णमंदिराबाबतचा दहशतवाद उल्लेखनीय मानावा लागतो. खलिस्तानवाद्यांचा जो दहशतवाद त्यावेळी अस्तित्वात होता, त्याने सारा देश ढवळून निघालेला होता. चुकून-माकून कुणी एखादा त्या भागात गेला तर त्याला 'हिंदुस्थान से आये हो क्या'? असे विचारले जायचे. या प्रश्नाचा रोख विचार करायला लावणारा आहे. याचा अर्थ हा होता की, खलिस्थानवाद्यांनी हिंदुस्थान आणि खलिस्थान अशी स्वघोषित फाळणी केली होती ? काश्मीर हा तर देशाच्या फाळणीपासूनच धगधगणारा प्रश्न झाला आहे. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असूनही तिथल्या लोकांना शेजारचे पाकिस्तानी घुसखोर 'आपण पाकिस्तानी आहोत' हे ठासून सांगत आहेत. तेही संभ्रमावस्थेत दिशाहीन होऊन देशद्रोह करीत आहेत. काही जणांना जबरदस्तीने पळवून नेऊन भारताविरूध्द चिथावले जात आहे. त्यांना निरनिराळी शस्त्रे चालविण्याचे शास्त्रशुध्द शिक्षण देऊन भारतात घुसवून दहशत माजवण्यास सांगण्यात येत आहे. नुकत्याच झालेल्या संसदभवन, दिल्ली येथील हल्ल्याची बाब आपण विसरलेलो नाही. काही वर्षापूर्वी भरदिवसा मुंबईत घडवून आणलेल्या बॉम्बस्फोटांच्या जखमाही ताज्याच आहेत. अगदी परवा झालेले रेल्वेतील बॉम्बस्फोटही ताजे आहेत. अगदी गेल्या जुलैमध्ये रत्नागिरीच्या सागरात 'अलमुर्तजा' ही मोटारबोट सापडली. त्यात काही शस्त्रे सापडली. याचा अर्थच हा आहे की भारतात दहशत माजवण्यासाठी चोरटया मार्गाने आजही शस्त्रे पाठविण्यात येत आहेत.

आंतरराष्ट्रीय पातळीवर दहशत माजवणा-यांमध्ये आज नाव घेतले जाते ते ओसामा बिन लादेन याचे. सध्या तो भूमिगत असल्याचे जरी सांगण्यात येत असले तरी वृत्तपत्रांतून आजमितीस ज्या बातम्या येत आहेत त्यावरून तो अद्याप अफगाणिस्तानातच असल्याचे जाणवते. एका बाजूला परवेझ मुशर्रफ 'दहशतवाद पाकिस्तानातून हद्दपार करीत आहोत' असे सांगत असले तरी ते सत्य मानता येणार नाही. एकेकाळी पाकिस्तानने त्याला उदार आश्रय दिला होता. वस्तुत: पाकिस्तान हा अमेरिकेच्या फेकलेल्या तुकडयावर जगलेला आणि जगत असलेला देश. त्याच पाकिस्तानने ओसामा बिन लादेनला आश्रय द्यावा आणि लादेनने अमेरिकेसारख्या बलाढय राष्ट्राची ट्रेड सेंटरची उत्तुंग इमरत मातीत गाडावी हे पाकिस्तानचेच दुर्दैव मानावे लागते. नाक मुठीत धरून अमेरिकेपुढे पाकिस्तानला झुकावे लागले.

ओसामा बिन लादेनच्या दहशतवादी कृत्याने जग खूप काही समजू शकले आणि शिकू शकले हे मान्यच करावे लागेल. धर्मासाठी मृत्यू कवटाळणा-या 'अल् कायदा' सारख्या भीषण दहशतवाद्यांची जगाला ओळख पटली.

KARVY'S INSTITUTE

भारत कित्येक वर्षांपासून 'पाकिस्तान हेच राष्ट्र दहशतवादी कारवायांना पाठबळ देत असते' असे सा-या जगाच्या कानी-कपाळी ओरडून सांगत असतानाही सा-या जगाने आणि अमेरिकेनेही तिकडे दुर्लक्ष केले. अमेरिकेने अफगाणिस्तानवर हल्ले सुरू केल्यावर याच अल् कायदाने जगातील सा-या मुस्लिमांना 'जिहाद'ची हाक दिली. या हाकेवरून जगातील काना-कोप-यात पसरलेल्या अनेक राष्ट्रांत राहणारे मुस्लीम लोक ते राहत असलेल्या देशाशी किती प्रामाणिक असावेत याची ओळख सा-या जगाला पटली. माथेफिरू दहशतवाद्यांच्या हिंस्त्र कारवायांनी एखाद्या राष्ट्राची किती अपरिमित हानी होते हेही सा-या जगाने जाणून घेतले.

एकूणच ही परिस्थिती अत्यंत विचारपूर्वक पाहिली तर माझ्यासारख्याच्या मनात एक निश्चित विचार येतो की, सा-या जगभर पसरलेल्या मुस्लिम समाजाच्या लोकांना एकत्र करून ओसामा बिन लादेन, परवेझ मुशर्रफ, दाऊद इब्राहिम यांच्यासारख्या नरराक्षसांना सारे जग पादाक्रांत करायचे आहे काय?

**71. दहशतवादी कृत्ये घडण्याकरीता या प्रक्रीयेत कोणती कृत्ये दिसून येतात ?**

**(a)** जनमानसांमध्ये कमी प्रमाणात रूजलेली देशभक्ती

**(b)** दहशतवादी कृत्यावर देशातील सुरक्षा यंत्रणेचा कमजोर झालेली पकड.

**(c)** दहशतवाद्यांना मिळणारा राजाश्रय.

**(1)** केवळ a **(2)** केवळ a व b **(3)** केवळ a व c **(4)** वरील सर्व

---

**72. खालील अचुक विधाने लक्षात घ्या.**

**(a)** भारतामध्ये सर्रास भर दिवसासुध्दा दहशतवादी कृत्ये घडतांना दिसतात.

**(b)** दहशतवाद्यांना सहसा दिवसापेक्षा रात्री दहशतवादी कृत्ये करणे सोपे जाते.

**परिच्छेदाच्या आकलनावरून पर्यायी उत्तरांपैकी योग्य उत्तर निवडा.**

**(1)** केवळ विधान **a** अचुक आहे. **(2)** केवळ विधान **b** अचुक आहे.

**(3)** दोन्ही विधाने अचुक आहेत. **(4)** दोन्ही विधाने अचुक नाहीत.

---

**73. परिच्छेदाच्या अवलोकनातून कोणती बाब स्पष्ट होते ?**

**(a)** आंतरराष्ट्रीय स्तरावर धर्म दहशतवादाचा महत्वाचा पाया दिसतो.

**(b)** देशातंर्गत दहशतवादामध्ये भाषावाद हा महत्वाचा पाया दिसतो.

**(c)** दहशतवादी कृत्ये राजाश्रयाशिवाय घडू शकत नाही.

**(1)** केवळ a **(2)** केवळ a व b **(3)** केवळ a व c **(4)** यापैकी नाही.

---

KARVY'S INSTITUTE

**74. खालीलपैकी अचुक विधाने कोणती ?**

(a) देशांतर्गत दहशतवाद एक प्रकारचा देशद्रोहच आहे.

(b) देशांतर्गत दहशतवादाचा संबंध आंतरराष्ट्रीय दहशतवादाशी नसतो.

(c) दहशतवाद हा सामाजिक बदलातील गरजेच्या प्रेरणेतून निर्माण झाला असतो.

(1) केवळ a (2) केवळ a व b (3) केवळ a व c (4) यापैकी नाही.

---

**75. परिच्छेदाच्या आकलनातून काय स्पष्ट होते ?**

(1) दहशतवादास आळा घालणे कठीण आहे.

(2) दहशतवादाचा नायनाट धर्माच्या नष्टीकरणाने शक्य आहे.

(3) दहशतवाद प्रामुख्याने मुस्लिम धर्मिय करतात.

(4) दहशतवाद हा राजकीय भावनेने प्रेरीत असतो.

---

**सुचना :** खालील पाच प्रश्न हे स्पर्धकाची निर्णयक्षमता तपासण्याकरीता आहेत. या प्रश्नांमध्ये ऋणात्मक गुणांक नाही.

**76. तुम्ही एका शासकीय महाविद्यालयाचे प्रिन्सिपॉल आहात. तुमच्या महाविद्यालयात काही विद्यार्थी संघटीत होऊन इतर विद्यार्थ्यांना एका आंदोलनात सहभागी होण्याकरीता तयार करीत आहेत. ते आंदोलन एका बाजूने शासनाच्या विरोधात दिसत आहे, पण त्याची दुसरी बाजू मात्र विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी आहे असे दिसते. तुमची भूमिका कशी राहील ?**

(1) त्या विद्यार्थ्यांना ताबडतोब पोलिसांच्या ताब्यात दयाल जेणेकरून शासनविरोधी कार्यास आळा बसेल.

(2) विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दयाल.

(3) शासनास याबाबत सविस्तर कळवून शासन आदेशान्वये कार्यवाही कराल.

(4) विद्यार्थ्यांना आंदोलनाचे स्वरूप सनदशीर करावयास तयार कराल.

---

**77. गरीबी निमूलनाकरीता शासनास सर्वसमावेशक योजना बनवायची असल्याने काही अभिप्राय मागीतले आहेत. त्या अभिप्रायाची छाननी करण्याकरीता आपण एक समिती सदस्य आहात. खालीलपैकी कोणत्या सुचनेवर आपण अधिक लक्ष केंद्रीत करू इच्छिता ?**

(1) ओडीसा राज्यातील अन्न व सुरक्षा विभागाच्या दहा वर्षांचा अनुभव असलेल्या सचिवाच्या सुचना.

(2) आंतरराष्ट्रीय मजूर संघटनाने भारतावरील काढलेले निष्कर्षांचा तपशील

(3) मध्यभारतात कार्यरत एकलव्य या समाजसेवी संघटनाने आर्थिक विषमतेवरील तयार केलेला अहवाल.

(4) टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोसिअल सायन्सच्या विद्यार्थ्याने मुंबईतील धारावी झोपडपट्टीतील 'गरीबी आणि स्त्रीचे स्थान' या विषयावर तयार केलेला प्रबंध.

---

KARVY'S INSTITUTE

**78. तुम्ही एका वाचनालयाचे नियमित वाचक आहात. वाचनालयाचा ग्रंथपाल अत्यंत निष्काळजीपूर्वक आपले व्यवस्थापन पहातो. त्यामुळे संपूर्ण पुस्तके, ग्रंथ, मासिके अस्ताव्यस्त स्थितीत आहेत. वाचकांना बरेच वेळा आवश्यक पुस्तके उपलब्ध होत नाहीत. ग्रंथपाल तुमच्या राज्याच्या मुख्यमंत्र्याचा साळा असल्याने त्याचे विरूध्द कार्यवाही होणे शक्य नाही असे दिसते. आपण काय कराल ?**

(1) सर्व वाचक सभासदांना गोळा करून स्वत: सर्व पुस्तके, ग्रंथ व मासिके दर वेळेस सुव्यवस्थित ठेवाल.

(2) सरकार बदलण्याची वाट पहाल जेणेकरून नवीन सरकारामध्ये ग्रंथपालाची तक्रार करणे सोपे होईल.

(3) त्याचे वरिष्ठांस तक्रार करून कार्यवाही न झाल्यास जनआंदोलन निर्माण कराल.

(4) सभासदांना वाचनालयावर बहिष्कार टाकण्याचा सल्यता दयाल.

---

**79. तुमच्या ऑफीसच्या बाजूला चहा वाल्याकडे एक आठ वर्षाचा मुलगा कामाला आहे. तो अनाथ आहे म्हणून चहावाल्याने त्याला दयेपोटी कामाला ठेवले आहे. चहावाला स्वभावाने खूपच दयावान आहे. तो त्याला आपल्या मुलासारखा वागवितो परंतु त्याच्या शिक्षणाला चहावाला तयार नाही कारण त्यामुळे त्याचा धंदा अडचणीत येऊ शकतो. त्या चहावाल्याचे दुकान सकाळी आठ ते रात्री आठ वाजेपर्यंत असते. तुम्ही कशी भूमिका घ्याल ?**

(1) बालमजूरी गुन्हा आहे म्हणून पोलिसात त्याची तक्रार करून चहावाल्याची अटक करून घ्याल.

(2) स्वयंप्रेरणेने दुपारच्या चहावेळात त्या मुलास अर्धातास शिकविण्याचा प्रयत्न कराल.

(3) चहावाल्यावर बहिष्कार टाकून मुलास शिकविण्यास बाध्य कराल.

(4) मुलास एखाद्या स्वयंसेवी संस्थेस सुपूर्त कराल.

---

**80. निराश झालेला कोणत्या व्यक्तीची आत्महत्या करण्याची प्रवृत्ती विकसित होणार नाही असे तुम्हास वाटते ?**

(1) जो स्वयंकेंद्रीत ध्येयवादी आहे.

(2) जो मनमिळावू मैत्री करणारा आहे.

(3) जो कोणतीही उगाच जिद्द ठेवत नाही.

(4) जो वेडा नाही.

---

KARVY'S INSTITUTE

**सुचना – (पृष्ठ 1वरून पुढे )**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे. असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या परिक्षामंध्ये होणाया गैरप्रकारांना प्रतिवंध करण्याबाबतचे अधिनियम82 यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्तीस कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि / किंवा रूपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत: बरोबर परिक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. मात्र परिक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.

---

**नमुना प्रश्न**

प्रश्न क्र. 81 सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर (3) राजा राममोहन रॉय असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर (3) होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्र. क्र. 81 समोरील उत्तरक्रमांक (3) हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र.क्र. 81 (1) (2) ● (4)

अशा पध्दतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. ह्याकरिता फक्त काळया शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.

---

KARVY'S INSTITUTE